# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २१-०४-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सोमवार दिनांक २१ एप्रिल २००८ रोजी (दि.३१-३-२००८ ची तहकूब सभा) मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.५० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०२. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०३. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०४. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०५. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०६. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०७. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
०८. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
०९. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१०. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
११. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१२. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१३. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१४. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१५. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१६. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
१७. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
१८. स.स.सौ.दिपाली सुनिल पाटील
१९. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२०. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२१. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२२. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२३. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२४. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२५. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२६. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२७. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
२८. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
२९. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३०. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन खान

३१. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३२. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३३. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
३४. स.स.सौ.राऊत छाया विलास
३५. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
३६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३७. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
३८. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
३९. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ म.युनुस
४०. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४१. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४२. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
४३. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४४. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४६. स.स.सौ.रेखा कैलास काथार
४७. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
४८. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
४९. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५०. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५३. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
५४. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५५. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
५६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
५७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
५८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
५९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६१. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
६२. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
६३. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले

**चर्चा :**

श्री.किशोर तुळशीबागवाले : या महापालिकेचे माजी नगराध्यक्ष स्व.नंदलाल जैस्वाल यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :
श्री.संतोष जेजूरकर : } यास माझे अनुमोदन आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :

मा.महापौर :सर्वांनी श्रध्दांजली साठी उभे रहावे.

याच वेळी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष स्व.नंदलाल जैस्वाल यांचे दु:खद निधनाने सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. १९७ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये स्थायी समितीने सम्मत केलेले सन २००७-२००८ चे सुधारीत व सन २००८-२००९ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून अंतिम मान्यता देणे.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :ज्या सभापतीनी बजेट मंजूर करून सादर केले ते उपस्थित नाही नुतन सभापती उपस्थित आहे त्यांचे हस्ते सादर करावे.

याच वेळी स.सभासद यांची मा.महापौर यांचे डायससमोर मोठमोठयाने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी अर्थसंकल्पावर सभा आयोजित केली होती परंतू स.सदस्यांना त्यावर अभ्यास करावयाचा म्हणून सभा तहकूब केली होती आज त्यावर सविस्तर चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :३१ मार्च रोजी यावर सभा आयोजित केली होती तातडीचे काम निघाल्याने ही तहकूब करण्यात आली या बजेटवर सर्व पदाधिकारी यांनी एकत्रित बैठक घेवून योग्य त्या दुरूस्त्या करून निर्णय घ्यावा.

श्री.अ.रशिद खान :अगोदर बजेट सादर करून घ्यावे नंतर चर्चा करता येईल.

श्री.संजय सिरसाट :मा.सभापती श्री.त्र्यंबक तुपे यांनी आपल्या दालनात बजेट सादर केलेले आहे. मा.महापौर या नात्याने बजेट आपल्याकडे आल्यानंतर रिपीट करण्याची गरज नाही. तत्कालीन सभापती यांनी बजेट सादर केलेले आहे त्यावर चर्चा सुरू करावी. नवीन सभापतीचा सादर करण्याचा अधिकार येत नाही नविन पायंडा पाडू नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मी सभापती या नात्याने बजेट सादर करीत आहे.

श्री.संजय सिरसाट :एकदा सभापतीने बजेट मा.महापौरांकडे सादर केले आहे परंतु सादर करता येणार नाही चर्चेला सुरूवात करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मी बजेट पुस्तक मा.महापौरांना देत आहे.

अनेक सदस्य व्यासपीठा समोर येतात.

मा.महापौर :बजेट ऑलरेडी मी सभापतींकडून सादर करून घेतलेले आहे त्यांचे प्रती आपणा सर्वांना मिळालेल्या आहे. आता बजेटवर चर्चा करावी.

याच वेळी मा.महापौर डायस समोर मोठमोठयाने बोलणे चालू असते.

सौ.लता दलाल :गोंधळ होत असेल तर सभा तहकूब करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :३१-३-२००८ रोजी सादर केलेले बजेट समोर आहे त्यावर चर्चा होवून योग्य तो निर्णय व्हावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नांदेड येथे गुरूतागद्दी गतीचा कार्यक्रम वर्षभर चालणार आहे. देशभरातून नागरीक येतील या शहरात आल्यानंतर त्यांची सर्व व्यवस्था होण्यासाठी बजेट मध्ये एक कोटीची तरतूद करावी अशी विनंती.

श्री.अ.रशिद खान :सभागृहात पिठासीन अधिकारी म्हणून बसल्यानंतर सर्व सदस्या समान असतात ते कुण्या पार्टीचे नसतात एक सदस्याचे ऐकले जाते एकाचे नाही. आपण सुशिक्षित आहात असे असतांना दुजाभाव होत असेल योग्य नाही. ही लोकशाही पध्दत नाही सर्वांना सोबत घेवून चालावे. ३० मार्च पूर्वी ही बैठक घ्यावयास पाहिजे होती.

मा.महापौर :आपला मुद्दा समजला आहे पिठासीन अधिकारी म्हणून मी सर्वांना सोबत घेवून कामकाज केलेले आहे यापेक्षा वेगळे आपण वेगळे बोलणे योग्य नाही.

श्री.अ.रशिद खान :अगोदर बजेट सादर करून घ्यावे त्यानंतर चर्चा करून योग्य व्हावा.

मा.महापौर : नवीन पायंडा पाडू नये बजेट यापूर्वी मा.सभापती यांनी माझेकडे सादर केलेले आहे त्याचे बुकही स.सदस्यांना यापूर्वी देण्यात आले. विनंती शहराच्या विकासासाठी बजेटवर चर्चा करावी.

श्री.संतोष जेजूरकर :बजेटवर चर्चेला सुरूवात करावी.

याच वेळी सभागृहात स.सदस्य श्री.अ.रशिद खान मामू हे मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :एका वेळेस एक सदस्यांनी बोलावे.

श्री.अ.रशिद खान :एक सदस्य बोलल्यानंतर ऐकूण घेत नाही. ठरावीक सदस्यांचे ऐकुण निर्णय घेतला जातो हे योग्य नाही.

मा.महापौर :स.सदस्य श्री.अ.रशिद खान मामू हे सभागृहाचे जेष्ठ सदस्य आहेत बजेटवर चर्चा केली पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आताच स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी नांदेड येथील कार्यक्रमासाठी १ कोटीची तरतूद करण्याची मागणी केली त्यावर आपण निर्णय द्यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :स.सदस्य व माजी महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी नांदेड येथील गुरूगोविंदसिंग यांचे कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरीकांच्या सोयीसाठी होणारा खर्च यासाठी १ कोटीची तरतूद करण्याची विनंती केली औरंगाबादला व्यवस्था व्हावी नांदेड महानगरपालिकेस राज्य शासनाने व केंद्र शासनाने अर्थसाहय केले आहे. आपण १ कोटी तरतुद मान्य करावे. प्रस्ताव मान्य करावा काम तातडीने करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी नांदेड येथे गुरूतागद्दी हा कार्यक्रम वर्षभर चालणार आहे. त्या ठिकाणी सर्व शिख बांधव व इतर जगभरातून लोक येणार असून

मराठवाडयाचे केंद्र औरंगाबाद असल्यामूळे येणाऱ्या भाविकांची व्यवस्थीत व्यवस्था व्हावी याकरीता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात एक कोटीची मागणी केली ते तरतूद मान्य करावी त्यास मी अनुमोदन देतो.

श्री.वसंत नरवडे :जो एक कोटी गुरूतागद्दी या कार्यक्रमानिमित्त या शहरात येणाऱ्या सर्व भावीक शिख बांधवाची गैरसोय होवू नये म्हणून त्यासाठी जो १ कोटी तरतूद करण्याचा ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. त्या नागरीकांसाठी जे काही चांगले करता येईल ते करावे महापालिकेचे नावलौकिक होईल मराठवाडयात देशात नाव होईल या ठरावास माझे अनुमोदन आहे. बजेटमध्ये तरतूद करावी.

श्री.अ.रशिद खान नांदेड येथील गुरूतागद्दी या कार्यक्रमासाठी कमेटीने सर्व प्रांतातील भावीकांना बोलविले आहे जगभरातून लोक येणार आहे दोन तीन वर्षापासून काम चालू महापालिकेच्या वतीने त्या कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकाची गैरसोय होवू नये यासाठी बजेटमध्ये खर्च करण्यासाठी एक कोटीची तरतूद करण्यात यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :हे काम केल्यास पॉजीटिव्ह होईल विकासाचे काम आहे महापालिकेचे नाव होईल सर्वांच्या सम्मतीने मान्य करण्यात यावे.

श्री.संजय जगताप :आमच्या सर्व आघाडीच्या सदस्यांचा या ठरावास पाठिंबा आहे. मंजूरी देण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महिला महापौर यांचे कार्यकाळात हे काम झाले आपले नाव होईल सर्वाची सम्मती आहे मंजूरी द्यावी.

मा.महापौर : सन २००८ या वर्षात नांदेड येथे गुरूतागद्दी हा सोहळा होणार आहे. या निमित्ताने देश विदेशातून अनेक भावित या शहरातून तेथे जाणार आहे त्याची गैरसोय होवू नये यासाठी महापालिकेला विविध विकास कामे करावी लागणार आहे त्याकरीता या अर्थसंकल्पात १.०० कोटीची तरतूद ठेवण्यात मान्यता देण्यात येते. कामाच्या यादीसहीत ती बजेटमध्ये यावी.

श्री.सलीम खान :बजेटमध्ये तरतूद ठेवली ती समान नाही. वार्ड कार्यालय अ,क अंतर्गत मुस्लीम समाजाचे लोक जास्त आहेत त्यामूळे तरतूद कमी ठेवली वार्ड कार्यालय क साठी फक्त ३ कोटी आहे वार्ड कार्यालय ड,फ,इ यास सात कोटी व त्यापेक्षा जास्त आहे. १० टक्के वाढीव ठेवण्यात हरकत नाही. सत्ताधारी व पदाधिकारी मिळून या भागातील नागरीकावर अन्याय करीत आहे. हा सरळ सरळ जातीवाद आहे. त्यामूळे मी बजेट आपल्या समक्ष सभागृहात जाळतो आहे.

याच वेळी स.सदस्य श्री.सलीम खॉन हे बजेट बुक पुस्तिका सभागृहात जाळण्यास सुरूवात करतात.

मा.महापौर :स.सदस्य यांनी असे कृत्य करणे बरोबर नाही. सभागृहात शिस्त पाळावी.

याच वेळी मा.महापौर स.सदस्य श्री.सलीम खॉन यांना वारंवार सुचना देवूनही त्यांनी सभागृहात बजेट पुस्तीका जाळली.

श्री.सतीश कटकटे :यामूळे सभागृहात जीवीत हानी होवू शकते. संबंधीत सदस्य यांचेवर गुन्हा दाखल करून सभासदत्व रद्द करावे.

याच वेळी स.सदस्य श्री.सलीम खान यांचे सभासदत्व रद्द करण्याची स.सदस्य मागणी करतात. मोठमोठयाने बोलणे चालू असते काही ही ऐकू येत नाही.

मा.महापौर :असे करण्याचा अधिकार सदस्यांना नाही स्थायी समितीचा अवमान केलेला आहे.

श्री.संतोष जेजूरकर :जातीवादावर बोलत आहे सभासदत्व रद्द करण्यात यावे.

मा.महापौर :सभागृहात बजेट पुस्तीका जाळून स.सदस्य श्री.सलीम खॉन यांनी सभागृहाचा अवमान केला असल्याने व सभासदाची मागणी विचारात घेता त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते.

श्री.सलीम खान :कोणत्या कायद्यानुसार सभासदत्व रद्द करता येते.

श्री.अमोदी अबूबकर :वार्ड कार्यालय क साठी कमी बजेट का ठेवलेले आहे खुलासा द्यावा.

मा.महापौर :ज्या सदस्यांना बजेटवर चर्चा करायची आहे त्यांनी अगोदर नावे द्यावी.

याच वेळी वार्ड कार्यालय क संदर्भात विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा व्हावा या मागणीसाठी स.सदस्य श्री.अबुबकर अमोदी यांनी डायस वरील राजदंड ओढण्याचा प्रयत्न करतात मोठमोठयाने बोलणे चालू असते.

मा.महापौर :असे वर्तण करणे बरोबर नाही सर्वांना जागेवर बसण्याच्या सुचना दिलेल्या आहे. ऐकले नाही तर सभासदत्व रद्द केले जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :स्थायी समितीकडून आलेले बजेट आहे चर्चा करून यात दुरूस्ती करावी.

मा.महापौर :सर्व सदस्यांना विनंती की आपआपल्या जागेवर बसावे सर्व प्रश्नाचा खुलासा होईल.

श्री.मो.जावेद मो.इसाक :वार्ड कार्यालय क साठी कमी बजेट का ठेवलेले आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान :इतर वार्ड समिती इतकेच वार्ड कार्यालय क साठी बजेट ठेवावे. नसता एकही काम होवू देणार नाही जातीवाद होतो असे वरीष्ठांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.

श्री.अमोदी अबूबकर :वार्ड कार्यालय क अंतर्गत ५० टक्के भाग स्लम भाग आहे. तेथे विकास कामे करणे गरजेचे आहे. कमी बजेट ठेवलेले आहे वाढवून द्यावे. सर्व वार्डात बरोबर ठेवावे.

श्रीमती शमशाद बेगम :तीन वर्षापासून वार्ड कार्यालय क साठी जास्तीचे बजेट ठेवले जात नाही. प्रत्येक वार्डसाठी १२,१५ लक्षच्या वरती कामे होत नाही. मागिल वर्षी या वार्डासाठी बजेट वाढवून द्यावे म्हणून पत्र दिले होते तरतूद केली नाही मध्यंतरी

बजेट नसल्यामूळे माझे वार्डात पिण्याच्या पाण्याचे विकास काम होते ते थांबून राहिले कमी बजेट मध्ये वार्डातील पुरेसे काम होत नाही.

श्री.अ.रशिद खान :काही वार्ड कार्यालयासाठी १० कोटी तर काहीसाठी ५ कोटीच्या आत का ठेवले.

श्री.अमोदी अबुबकर :वार्ड कार्यालय अ व क साठी बजेट का कमी ठेवले तेथील वसूली होत नाही का ?

मा.आयुक्त :पाणीपट्टी व मालमत्ता कराची वसूली ही वार्ड कार्यालय अंतर्गत करीत असल्यामूळे मध्यंतरी असा निर्णय घेतला होता की त्या-त्या वार्ड कार्यालयातील वसुली जेवढी असेल त्या प्रमाणे वार्ड समितीचे बजेट विकास कामासाठी असणार. एकूण दोन्हीच्या माध्यमातून एकूण ३७-३८ कोटी वसूली आली. ती सर्व वार्ड समितीला वाटप करण्याचे ठरविले कोणत्या वार्डला किती पैसे द्यायचे त्या वार्ड समितीमार्फत किती वसूली आहे व किती वसूली आली या दोन्हीचा विचार करून जेवढी वसूली झाली ती वार्ड कार्यालयाचे बजेट म्हणून देवू असे प्रशासनाने प्रस्तावीत केले. वार्ड अ-मध्ये वसूली कमी असेल तरी टक्केवारी ६० टक्के होती वार्ड कार्यालय क ने फक्त ४० टक्के वसूल केले. वसुलीच्या टक्केवारी व आकडेवारी असे दोन्ही गोष्टीचा विचार करून बजेट दिलेले आहे. वार्ड समिती अ मध्ये ३.४० कोटी वार्ड समिती ब मध्ये ८ कोटी वसूली टक्केवारी कमी होती म्हणून ८ कोटी ऐवजी ६ कोटीच दिले वार्ड समिती क २.६३ कोटी म्हणजे ४० टक्केच वसूली तरी सुध्दा ४ कोटी बजेट दिले कारण तेथे वसूलीसाठी अडचण येते. वार्ड समिती ड मध्ये ७८ टक्के वसूली ९ कोटी वसूली १० कोटी बजेट दिले जेथे टक्केवारी चांगली आहे तेथे वाढवून दिले वार्ड समिती क मध्ये वसूली करणे थोडे अवघड पडते कारण लहान रक्कम आहे ई कार्यालयाची वसूली ३-७६ कोटी वार्ड कार्यालय फची वसूली ९-२२ कोटी आहे. पाणीपट्टी व मालमत्ता कराची एकूण वसूलीच्या प्रमाणानुसार दिले वार्ड कार्यालय अ,क,ई यास वसुलीपेक्षा जास्त बजेट ठेवले.

श्री.मो.जावेद मो.इसाक :जेवढी वसूली तेवढे वार्ड वाईज बजेट दिले का? दिले असेल तर या सभागृहात महापालिकेचे लोगो आहे त्यावर काय लिहिलेले आहे व त्याचा अर्थ काय खुलासा करावा.

मा.आयुक्त :निष्काम जनसेवाये समर्पिता असे दिले आहे. याचा अर्थ या शहरातील सेवा निष्काम पणे करावयास पाहिजे त्यासाठी महापालिका पूर्णपणे समर्पित आहे. वसुली व टक्केवारीचा विचार करून बजेट दिले आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक :वसुलीच्या प्रमाणकानुसार बजेट ठेवले असेल तर ही पध्दत चूकीची आहे. वसूली करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे

का वसूली केली नाही. वार्ड समिती क मध्ये दलित व अल्पसंख्यांकाचा आहे. गरीब लोक असून जास्तीत जास्त भाग हा ते निवासी आहे. त्यामूळे वसूली कमी येत असेल उलट टॅक्स कमी केला पाहिजे याचा अर्थ असा होत नाही की वसूलीच्या प्रमाणावर बजेट ठेवले पाहिजे.

मा.आयुक्त :एकूण रक्कम कमी हे मान्य आहे परंतु वसुलीची टक्केवारी सुध्दा कमी आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक :वसुलीवर बजेट ठेवणे हे चूकीचे आहे वार्ड समिती क साठी १ कोटी वाढवावे. वसूली होत नसेल ही जबाबदारी नगरसेवकांची नाही.

मा.आयुक्त :वसुली करणे प्रशासनाचे काम असून प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावानुसार स्थायी समितीने हा प्रस्ताव दिला आहे.

श्री.जावेद हसन खान :वसूलीचा विचार करून वार्ड समिती क साठी बजेट कमी देणे बरोबर नाही. वसुली करण्याचे काम कर्मचाऱ्यांचे असते प्रशासन जबाबदार आहे.

मा.आयुक्त : प्रशासनाचा प्रस्ताव होता स्थायी समितीने मान्य केला आहे. स्थायी समितीने निर्णय घ्यावयास पाहिजे होता.रू.२.६३ कोटीची वसूली असतांना ६०-६५ टक्के वार्ड समिती क साठी बजेट दिले.

श्री.मो.जावेद मो.इसाक :वसुलीच्या प्रमाणकानुसार वार्ड कार्यालयासाठी बजेट ठेवणे चुकीचे आहे ही पध्दत बरोबर नसून ती बदलावी. वार्ड कार्यालय क साठी एक कोटी आणखी वाढवून द्यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :वार्ड कार्यालय क अंतर्गत कमर्शियल भाग कमी असून निवासी जास्त तसेच लहान आकाराची घरे असून गरीब लोक राहतात त्यामूळे वसूलीचे टारगेटही कमी आहे इतर वार्ड कार्यालयात मोठमोठया इमारती असून कमर्शिलय वापर जास्त असल्यामूळे वसूली जास्त होते. गरीब नागरीकांना सुविधा मिळण्याच्या दृष्टीने विचार करून यात तशी दुरूस्ती करून वार्ड कार्यालय क साठी एक कोटीची वाढीव तरतूद करावी. जेणे करून गरीब नागरीकांसाठी तरतूद केली यात महापौर म्हणून आपलाही सन्मान आहे. सर्वांच्या सहमतीने दुरूस्ती करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ज्या भागात बेसीक सुविधा नाही अशा भागाचा सर्वे करून एक बेस तयार करावा. व स्पेशल तरतूद करावी. वसुली करण्यास आपला सर्वाचे सहकार्याची गरज आहे लहान वस्त्या मोहल्ले आहे त्यास बेसीक सुविधा देत नाही तोपर्यत या ऐतिहासिक शहराला महत्व नाही. कर भरण्यासाठी नागरीकांना जागृत करावे शासनाच्या ज्या ही योजना असेल त्या सर्वच भागात झाल्या पाहिजे. जेणे करून कुणाचीही हरकत असणार नाही.

मा.आयुक्त :जी वसुली होती ती वाटप केली ज्या वार्ड कार्यालयाची वसुली टक्केवारीनुसार जास्त होती त्यास झुकता माप दिले

ज्या वार्डाची वसूली टक्केवारी कमी त्यांना कमी दिले. वार्ड कार्यालय क प्रमाणेच वार्ड कार्यालय ब व ई आहे त्यांना टक्केवारीनुसार ठेवले वार्ड कार्यालय ब ची वसुली ८ कोटी असतांना सहा कोटीच ठेवले दीड कोटी काढून सी कार्यालयासाठी दिले. इतर तीन वार्ड कार्यालयास जास्त दिले. वार्ड कार्यालय क ची वसुली २.६३ कोटी असून ४-०० कोटी दिले. एक कोटी वाढवायचे असेल ते कशातून टाकायचे ते सुचवावे ते टॅक्स मधून द्यायचे किंवा मुख्यालयातील कामामधून.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :आतापर्यत ज्या ज्या वार्डासाठी बजेट ठेवले जात होते ते पूर्ण खर्च झालेले आहे का?

श्रीमती मेहरून्नीसा खान :स्थायी समितीचे सभापती पदी श्री.अ.साजेद अ.सत्तार यांची निवड झाली त्या बद्दल त्यांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करावा. जेवढे वार्डाचे बजेट ठेवले, तेवढे काम झाले का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :स्थायी समितीच्या सदस्यांनी डिफेन्ड करावयास पाहिजे.

श्री.अ.रशिद अ.सत्तार :गेल्या वर्षी अनेक वार्डात कमी जास्त परंतु मा.आयुक्तांनी ५० लक्षच्या वर एकाही वार्डात काम केले नाही. आता किती लिमीट ठेवणार आहे तो निर्णय अगोदर घ्यावा.

मा.आयुक्त :महापालिकेला जे उत्पन्न येते त्याचा विनियोग कसा करायचा त्याचा संपूर्ण अधिकारी सभागृहाचा आहे. वसुली कमी व कामे जास्त असे झाल्यास त्यावेळी डिसाईड करावे लागते की कोणते कामे करणार फक्त बजेट करतांना लिमीट ठेवावे.

श्री.अ.रशीद खान :स्थायी समितीने बजेट वाढविले आता हे सभागृह वाढवेल प्रशासन किती कोटीचे लिमीट ठेवणार आहे. व प्रत्येक वार्डात किती रक्कमेची काम होईल. गेल्या वेळेस ५० लक्ष एका वार्डासाठी होते अनेक कामे स्पील ओव्हरमध्ये गेली.

मा.आयुक्त :पूर्ण टारगेट देण्याचा प्रयत्न केला जाईल ते साध्य होईल की नाही हे सांगता येणार नाही. प्रॅक्टीकली पॉसीबल आहे स्थायी समितीने वाढवून दिले प्रयत्न करू वसुली तेवढी झ ााली तर त्याप्रमाणे करू.

श्री.अ.रशीद खान :एका वार्डासाठी किती खर्च करणार अनेक कामे स्पील ओव्हरमध्ये गेली ते काम करणार की नाही.

मा.आयुक्त :जेवढे येतील तेवढेच खर्च केले तर लिमीट लावण्याची गरज नाही. विनंती आता बजेट न वाढविता जे कामे योग्य वाटत असेल ती घ्यावी. लिमीट लावण्याची गरज भासणार नाही असे करावे.

श्री.अ.रशीद खान :टेंडर काढूनही काम करू नये म्हणून अधिकारी दबाव टाकतात तीन तीन महिने झाले कामे होत नाही. एक २५ लक्षचे काम केले दुसरे केले नाही लिहून दिले दुसऱ्या क्रमांकाचे यांना दिले.

मा.आयुक्त :आपल्याला यादी दिली जाईल की मागिल वर्षी किती टेंडर झाले व तीन महिण्याच्या आत वर्क ऑर्डर दिली नाही म्हणून काम करण्यास मनाई केली. व १२० दिवस कशासाठी लागलेत.

श्री.अ.रशिद खान :ठेकेदारावर अंतर्गत दबाव असतो. आजच लिहून द्यावे आमच्या माणसास काम मिळाले पाहिजे. हे बरोबर नाही.

श्री.संजय जगताप :स्थायी समितीचे सभापती नव्याने निवडूण आलेले आहे त्यांचा या सभागृहाच्या वतीने सत्कार करावयास पाहिजे होता. आघाडीचे म्हणून जाणून बुजून केला नाही. पुष्पगुच्छ देण्यास काय हरकत आहे.

मा.महापौर :बजेटवर आपण चर्चा करीत आहे वेगळा विषय आणू नये.

याच वेळी स.सदस्य श्री.संजय जगताप व स.स.श्री.सय्यद हे सभापतीचा सत्कार करावा म्हणून मागणी करतात व डायस समोर खाली बसतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :डायस समोर बसलेल्या स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून बजेटवर चर्चा करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :सत्कार करण्याचा मुद्या मांडला या सभागृहाशी संबधीत नाही ज्या सभागृहात निवड झाली त्यांनी सत्कार करावा.

श्री.संतोष खेंडके :जी कामे दिली होती ३ लक्ष ऐवजी ५० हजाराची कामे आलेली आहे. यात दुरूस्ती होणे गरजेचे आहे. अनेक विकास कामात तफावत आहे.

मा.महापौर :बजेटवर चर्चा करावी सत्काराचा विषय होत राहील.

श्री.काशिनाथ कोकाटे : बजेटवर स.सदस्यांनी आपआपल्या भावना मांडलेल्या आहे. प्रशासनाने दिलेले बजेटवर सदस्यांनी मत मांडले प्रशासनाने खुलासा केला सभागृहाच्या भावना व वार्डातील विकास कामे याचा विचार करून निर्णय घ्यावा. जी वसुली झाली नाही प्रशासन जबाबदार आहे. वसुली करण्यास नगरसेवकांचा उलट पाठींबाच राहिलेला आहे विरोध नाही. वार्डात विकास केला नाही तर परीणाम होईल असे प्रशासनाने न करता मागिल वर्षीचे टारगेट पूर्ण होण्यासाठी या वर्षी एप्रिल महिण्यापासून वसूली करावी. १२० कोटी ऐवजी ३८ कोटी ३०-३२ टक्केच वसूली झाली बजेट वर झालेला परीणाम हा वसूलीमूळे झाला ही जबाबदारी प्रशासनाची असते. आताच स.सदस्यांनी सुचना केल्यानुसार तसेच ज्यासाठी बजेट ठेवावे म्हणून ठराव केला त्याचा ही विचार करून व ज्या वार्ड कमेटीसाठी कमी बजेट दिले त्यांना जास्त देण्याचा विचार करावा. याची मा.आयुक्तांनी दखल घ्यावी या सभागृह आपल्याला अधिकार देत आहे सभागृह नेता तसेच विरोधी पक्ष नेता व काही सदस्यांच्या सम्मतीचे या बजेटला दुरूस्तीसह मान्यता द्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :माझे वार्डात एक काम मागिल वेळेस झाले नाही कामाची यादी देत आहे त्यास मान्यता देवून जेवढी जास्त रक्कम

ठेवता येईल ती दयावी एक सर्वांना न्याय देण्याचे काम होईल. दुरूस्ती सहीत या बजेटला मंजूरी द्यावी. स.सदस्यांनी केलेल्या सुचना व वार्ड क साठी विचार करून जास्तीत जास्त बजेट मध्ये तरतूद करून दुरूस्ती सह मंजूरी द्यावी.

श्री.संतोष खेंडके :माझे वार्डात १० कामे ठेवली होती ५ लक्ष ऐवजी त्या कामासाठी ५०,२५ हजार केले. एवढया कमी रक्कमेत कामे होणार नाही. यात दुरूस्ती करणे गरजेचे आहे. ती करावी विशेष लक्ष घालावे.

सौ.पुष्पा शिंदे :जयभवानीनगर येथील नाल्याचे काम करण्यासाठी १.०० कोटीचा प्रशासकीय प्रस्ताव ठेवला होता ते यात नमूद नाही. तसेच वार्ड कार्यालय ई साठी आणखी बजेट वाढवून द्यावे.

श्री.वसंत नरवडे :महापालिका व सिडको प्रशासनाने दिनांक २-८-२००५ च्या पत्रान्वये यांना कळविले होते की सर्वे नं. २३,२४ गारखेडा येथे असलेल्या हनुमाननगर या वसाहतीत काही नागरीक नाल्याच्या जागेवर घराची पक्की बांधकामे करीत आहे. एन-३,एन-४ पर्यत सिडकोने त्या नाल्याचे काम केले परंतू पुढे महापालिकेची हद्द असल्यामूळे महापालिकेने काम करावे असे पत्र दिले होते हे मागिल इतिवृत्तामध्ये आलेले आहे. प्रशासनाचा मागिल सभेत एक कोटीचा प्रस्ताव ठेवला होता परंतू बजेटमध्ये ते आले नाही. जशी रक्क्म उपलब्ध होईल त्या प्रमाणे काम करण्याची विनंती सदस्यांची आहे. नाल्याची सफाई महापालिकाच करणार असे दिले होते. आता पाणी आटते आहे त्यामुळे दुर्गंधी वाढलेली आहे. नाल्यासाठी बजेट नसल्यामूळे पुन्हा पुर्वीची परीस्थिती निर्माण होईल .एप्रिल चालू आहे केंव्हा कामे सुरू करणार आहे. तरतूद ठेवली नाही तर कामे सुरू होणार की नाही नागरीक हे पदाधिकारी महापौर सदस्यांना विचारणा करतील शहरातील सर्वांगिण विकास व नैसर्गीक आपत्तीसाठी तरतूद करणार काय? न ठेवल्यास ऐनवेळी कामे करता येतील का तीही तरतूद नाही. ज्या लोकांनी नाल्या वरील इमारती खालील गाळ साफ सफाई करण्याचे कबूल केले ती सफाई करून घ्यावी. पावसाळयाच्या अगोदर नाले सफाई व्हावी जेणे करून नागरीकांना त्रास होणार नाही त्यासाठी स्पेशल तरतूद महापौर म्हणून ठेवली तर तातडीचे काम करता येईल असे करावे.

श्री.विनायक पांडे :क्रिडा क्षेत्रामध्ये स्पर्धावर लाखो रू खर्च करतो एकही खेळाडू नाविन्य प्राप्त करू शकत नाही. १४ वर्षाखालील स्पर्धा होतात या स्पर्धामध्ये ज्यानी विदयापीठास चांगले काम केलेले स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर सभागृहात आहे. जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे कडून पुर्ण वर्षाचा शेडयूल तयार करून महापालिकेच्या शाळातील विदयार्थ्यांना

प्रशिक्षण दिल्यास दोन तीन वर्षात मुले निकाल देवू शकतील. योग्य असे बजेट ठेवून व साई स्पोर्ट ऑफ इंडिया हे विदयापिठासी संलग्नीत आहे मा.सिघंल साहेब तेथे आहेत अनेक बजेट त्यांनी शासनाकडून आणलेले आहे त्यांचे विचाराने महापालिकेने हे सुरू केले तर माझे वार्डात बास्केट बॉल मैदान आहे महापालिकेतर्फे चालू केलेली लाल मातीची व्यायाम शाळा सुध्दा आहे विदयापीठाचे मैदान आहे या जागेवर प्रशिक्षण वर्ग चालू केल्यास महापालिकेचे विदयार्थी निकाल देतील शहरात हनुमान टेकडी हे ही पर्यटन स्थळ आहे उत्तम प्लॅनीग करून विकसीत केल्यास महापालिकेचे नाव होईल.

सौ.कला बोरामणीकर :तीन वर्षापासून वरद गणेश मंदीर ते स्वातंत्र्य वीर सावरकर यांचे पुतळया पर्यत चे ड्रेनेज लाईनचे काम प्रशासनाकडून मंजूर होते टेंडर काढले जाते परंतू काम होत नाही. त्वरीत ते काम चालू करावे. जेणे करून सध्या त्या रस्त्यावर ड्रम प्रोजेक्टमूळे रस्ता खोंदकाम होत आहे पुन्हा खोदण्याची गरज पडणार नाही.

श्री.संजय सिरसाट :आजच्या बैठकीत बजेटवर विशेष चर्चा होईल असे अपेक्षीत होते. या पुर्वी बजेटवरील सभेत रूपया कसा येणार व जाणार सविस्तर चर्चा होत असे व वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाहीही झालेली आहे ठरल्याप्रमाणे मा.आयुक्तांनी ती चर्चा होवू दिली नाही. स्थायी समिती समोर बजेट आले त्यावेळी जकात रद्द झाल्याची घोषणा शासनाने केली व उपकर लागू करणार आहे त्याच क्षणी हा बजेट कोलमंडला गेला होता. किती कोटीची तूट होवू शकते यावर चर्चा चालू होती उपकराची वसुली महापालिकेच्या कर्मचाऱ्याकडून करायची परीपत्रक काढले कर्मचारी खुश झाले व बदली साठी प्रयत्न करू लागले परंतु ते झाले नाही पुन्हा त्याच एजन्सीला काही दिवसासाठी वसुली करण्याचे आदेशीत केले. उपकर लागू झाल्यानंतर बजेटची परीस्थिती कशी होणार याचा कुठेच खुलासा यात नाही अनेक महत्वाच्या गोष्टी यात राहून गेल्या परंतू सर्वाची धारणा अशी झाली की माझे वार्डातील काम यायला पाहिजे ईआरपी सिस्टीम दिली यात महापालिकेला येणारा पैसा किती व जाणारा किती हे संगणक दाखविणार आहे. मागील देणी पुर्ण होणार नाही तोपर्यत पुढील कोणतेही काम होणार नाही. होत असेल तर मा.आयुक्तांनी खुलासा करावा. जी काही सिस्टीम केली त्यात वर्क ऑर्डर देण्याची सिस्टम नाही. चार महिण्यानंतर उपकर लागू होणार वसुली कमी होणार या सर्व बाबींवर सविस्तर चर्चा होणे अपेक्षीत होते ती झाली नाही. सदस्य बजेट मध्ये तरतूद करण्याची मागणी करतील पत्र देतील

कामे घ्या म्हणतील प्रशासन तरतूद करून देण्याची मागणी करतील त्यामूळे या बजेटचा अर्थ राहणार नाही त्यात आपण सर्व काही अंशी चूक असेल म्हणून ठरल्या प्रमाणे ज्या चुका झाल्या त्या माफ करून मा.महापौरांना अधिकार देणार व ज्याची त्यांची कामे होणार ज्यांची होणार नाही त्याची जबाबदारी आयुक्त घेतीलच त्यासाठी सर्व पदाधिकारी मा.महापौर यांनी एकत्रित बसून सर्व सदस्यांचे वार्डातील नावे यात घ्यावी व ती करण्याचा प्रयत्न करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :स्पील ओव्हरची महत्वाचीच कामे घ्यावी नसता स्थगिती दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :स्पील ओव्हरमधील काम करण्याची गरज असेल तर करावे नवीन जी कामे सदस्य देतील त्यास प्राधान्य दयावे.

सौ.लता दलाल :बरीच यावर चर्चा झाली जर खरोखरच संगणक सिस्टीमद्वारे अशी प्रोसेस नुसार कामे होणार असेल तर त्याचा विचार करावा. मागिल बजेट मध्ये दिले होते की जकात खाजगीकरण झाल्यानंतर तेथील कर्मचारी कर वसूलीसाठी देणार जास्त वसूली होईल. परंतु अपेक्षीत वसुली झाली नाही प्रशासन कुठे कमी पडते. पुणे ठाणे महापालिकेत कराचे जे उद्दिष्ठ ठेवले जाते ते वसूल होते हे या महापालिकेने शिकण्या सारखे आहे. वसुली करण्यास कुणीही नगरसेवक विरोध करीत नाही कर भरणा करू नका असे कुणीही सदस्य सांगणार नाही एक दोन केसेसमध्ये अडचण असेल तर मार्ग काढण्याचे काम करीत असतील तो भाग वेगळा. विरोध करणारे कुणी असेल तसा खुलासाही करावा. वसुली झाली नाही तर विकास कामावर परीणाम होतो.जी जी विविध विभागाच्या मार्फत कर वसुल होतो त्यात कुठेतरी अजुनही कमी पडतो हा मुद्दा नोंद करावा. स्पील ओव्हरच्या कामे कमी जास्त झाली त्याचा उल्लेख यात आला स्थायी समितीकडे जी कामे दिली होती ती यात कमी प्रमाणात आली ज्या काही सुचना येतील पत्र येतील सर्वांशी विचार विनिमय करून हे अंदाजपत्रक दुरूस्तीसह मंजूर करावे. त्याचे अधिकार महापौरांना देण्यात यावे

श्री.संतोष जेजूरकर : कैलास नगर येथील विदयुत दाहिनी ही खराब झाली आहे त्यासाठी तरतूद करून चालू करावी. तसेच राजनगर येथे आयुर्वेदिक पंचचिकित्सालय केंद्र व आरोग्य केंद्र बांधण्यात आले आहे त्या ठिकाणी महापालिकेकडे आयुर्वेदिक डॉक्टर उपलब्ध आहे. पंच कर्म करण्यासाठी आयुर्वेदीक औषधी आधुनिक साहित्य पुस्तके प्रोजेक्टर सीडी व कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने त्या ठिकाणी शहरातील नागरीकांना आयुर्वेदीक उपचार करून घेण्यात अडचण येते. त्यासाठी तरतूद करावी तसेच मोठे रस्ते करण्यासाठी तरतुद करावी तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धा व भारतीय संघांची निवड चांचणी दिनांक १९ जून ते

२२ जून २००८ च्या दरम्यान होणार आहे महाराष्ट्रात औरंगाबाद शहरात प्रथमच भारतश्री मानाची स्पर्धा घेण्याचे संधी प्राप्त झाली आहे. ३४० खेळाडूचा सहभाग असणार असून ही महापौर चषक स्पर्धा घेण्यात यावी. वसूलीवर भर दयावा एप्रिल महिण्यापासून वसूलीला सुरूवात करावी. शरीरसृष्टी यासाठी मागिल वर्षीप्रमाणे तरतूद करावी दुरूस्तीसह मंजूरी देण्यात सर्वांच्या वतीने आपणांस मंजूर करण्याचे अधिकार देत आहोत.

मा.महापौर : बजेट वर अनेक सदस्यांनी चर्चा केलेली आहे महापालिकेची वसुली जास्तीत जास्त वाढावी व चांगल्या पध्दतीने जास्तीचे कामे करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न केला पाहिजे. या महिण्यापासून म्हणजे वर्षाच्या सुरूवातीपासून मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची वसुली करण्यावर भर दिला पाहिजे. अनेक सदस्यांनी वेगवेगळया सूचना केल्या त्या सर्व प्रशासनाने नोंद करून घ्याव्यात हा अर्थसंकल्प अंतिम करण्याचे अधिकार सभागृहाने महापौर म्हणून माझेकडे दिले त्यांचे मी आभारी आहे जो विश्वास सभागृहाने माझेवर दाखवला त्याकडे पुरेपूर मी लक्ष ठेवील व सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करेल सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार व दुरूस्तीनुसार हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये ठराव क्र.४६२ नुसार सन २००७-०८ चे सुधारीत अंदाजपत्रक तसेच सन २००८-२००९ चे मुळ अंदाज पत्रकास मान्यता प्रदान करून अंतिम मान्यतेकरीता मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला. सदर सभेत अर्थसंकल्पामधील जमा व खर्च बाजुंवर विशेष चर्चा होवून विकास कामांसाठी आवश्यक ती तरतुद उपलब्ध करून देणे बाबत तसेच सुधारीत अर्थसंकल्पातील प्रस्तावित तरतुदीमध्ये फेरफार करण्याचे सर्व अधिकार मा.महापौर यांना प्रदान करण्यात आल्यानुसार सन २००७-०८ चे सुधारीत अंदाज जमा रक्कम रू.२५७ कोटी ६४ लाख २५ हजार, यामध्ये प्रारंभीची शिल्लक २१ कोटी ५० लक्ष ३७ हजार असे एकुण २७९ कोटी १४ लक्ष ६२ हजार रक्कम तसेच खर्च रक्कम रू.२५७ कोटी ७७ लाख २५ हजार इतका लक्षात घेता रू.२१ कोटी ३७ लाख ३७ हजार शिलकीच्या सुधारीत अर्थसंकल्पास मंजुरी देण्यांत येते.

तसेच सन २००८-०९ च्या मुळ अर्थसंकल्पावर सर्व अभ्यासु व वरिष्ठ स.सदस्यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण सूचनांची नोंद घेवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० नुसार मुळ अर्थसंकल्प रू.३६४ कोटी ७९ लाख ६० हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.२१ कोटी ३७ लाख ३७ हजार असे एकूण रू.३८६ कोटी १६ लाख ९७ हजार जमा व रू.३८५ कोटी ९३ लाख ८५ हजार अपेक्षित खर्च यासह रू.२३.१२ लक्षच्या शिलकी अर्थसंकल्पास जमा व खर्च बाजुमध्ये आवश्यक ते फेरबदल व दुरूस्त्यांसह सर्वानुमते अंतिम मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच मा.महापौर यांनी आजची सभा राष्ट्रगिताने संपल्याचे जाहीर केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.